# जपानी तंत्रज्ञांनीही केले मुंबईच्या मेट्रोचे तोंडभरून कौतुक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे कुलाबा-वांद्रे-सीप्झ असा देशातील पहिला वहिला भुयारी मेट्रो मार्ग ३ उभारण्यात येत असून, या मार्गाच्या कामाचे जपान इंटरनॅशनल कॉर्पोरेशन एजन्सीच्या अधिकाऱ्यांनी तोंड भरून कौतुक केले आहे.

एमआयडीसी मेट्रो स्टेशन, आरे कारडेपो, सारीपूत नगर येथील कामाची या अधिकाऱ्यांनी पाहणी केली असून, कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांसोबत संवाद साधताना भुयारी मेट्रो-३च्या कामाबाबत समाधानदेखील व्यक्त केले आहे.



मुंबईच्या मेट्रोला जपान इंटरनॅशनल कॉर्पोरेशन एजन्सीने १३ हजार कोटी रुपयांचे कर्ज दिले आहे.

## मेट्रो ३ मार्ग

कुलाबा - वांद्रे - सीप्झ

पहिला टप्पा : सीप्झ - बीकेसी

दुसरा टप्पा : बीकेसी - कुलाबा

**१७** लाख प्रवासी मेट्रो ३च्या पूर्णत्वानंतर प्रवास करू शकणार.

- मुंबई मेट्रो लाईन ३च्या ट्रेन ८ डब्यांच्या असतील.
- **२४००** प्रवासी एका गाडीतून प्रवास करू शकतील.

## १००% भुयारीकरण पूर्ण

- प्रकल्पाचे एकूण ७६.६ टक्के काम पूर्ण झाले.
- मेट्रोचा आणखी एक आठ डब्यांचा दुसरा रेक रस्ते मार्गाने आंध्र प्रदेशमधील श्रीसिटीहून मुंबई दाखल होणार आहे.

**२६** स्थानकांमध्ये उभारण्यात येणाऱ्या महिला व पुरुष स्वच्छतागृहात बाळाचे डायपर बदलण्याची सुविधा असतील. पुरुष स्वच्छतागृहात बाळाचे डायपर बदलण्याची सुविधा करून देणारे मेट्रो ३ हे देशातील पहिले कॉर्पोरेशन असेल.

- मेट्रो मार्ग ३ची एकूण लांबी ३३.५ किमी
- मार्गात २६ भुयारी आणि एक जमिनीवरील अशी २७ स्थानके
- नरिमन पॉइंट, वरळी, वांद्रे-कुर्ला संकुल व आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय विमानतळ, मरोळ औद्योगिक वसाहत, सीप्झ अशी महत्त्वाची केंद्रे मेट्रो जोडणार.